## बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ माहे ऑक्टोबर २०११

## गुन्हे प्रकटीकरण शाखा कक्ष — २, गु.अ.वि., मुंबई
## अॅन्टोप हिल पो ठाणे गु.र.क्र. १७३/११ कलम ३०२,४५२,३९७ भा.दं.वि.

१) गु.र.क्र व कलम — अॅन्टॉप हिल पो. ठाणे १७३/११
कलम ३०२,४५२,३९७ भा.दं.वि.

२) गु.घ.दि व वेळ — दिनांक ०३.०६.२०११ पूर्वी १४.०० ते १९.०० दरम्यान

३) गु.दा.दि. व वेळ — दिनांक ०३.०६.२०११ रोजी २१.४० वा

४) गुन्हा उघडकीस — दिनांक २१/१०/२०११

५) फिर्यादी — श्रीमती. शितल संतोष राईलकर

६) बळीत — **मयत** १) श्रीमती. रंजना रमेश नागोठकर वय ५३ वर्षे
२) कुमारी वैष्णवी संतोष राईलकर वय साडेतीन वर्षे

७) आरोपी अटक — विशाल राजेद्र श्रीवास्तव, वय २१ वर्षे
दिनांक २१/१०/२०११

**गुन्हयाची हकिगत** — दिनांक ०३.०६.११ रोजी १४.०० ते १९.०० वा. या दरम्यान अॅन्टॉप हिल पोलीस ठाणे जी.टी.बी नगर, सायन कोळीवाडा, मुंबई—४ हद्दीतील इंदिरानगर को.ऑ.हौ. सोसायटीतील बी विंग, रुम क्र १०४, या ठिकाणी आरोपीताने फिर्यादी यांचे घरात घुसून फिर्यादीची आई व लहान मुलगी यांचे डोक्यात डंबेल्सचा लोखंडी रॉड मारून तसेच धारदार सुऱ्याने **मयत** श्रीमती. रंजना रमेश नागोठकर वय ५३ वर्षे व नात कुमारी वैष्णवी संतोष राईलकर वय साडेतीन वर्षे यांचे गळे कापून त्यांना जीवे ठार मारले व कपाटातील सोन्याचे दागिने व रोख रुपये ३५००/— असा एकूण ३,६३,५००/— रु. किंमतीच्या मालमत्तेची जबरीने चोरी केली. त्यावरून फिर्यादी श्रीमती शितल संतोष राईलकर यांचे तक्रारीवरून अॅन्टॉप हिल पो.ठाणे गु.र.क्र.१७३/११ कलम ३०२, ४५२,३९७ भा.दं.वि. अन्वये दुहेरी खुनाचा (आजी व नात) गुन्हा नोंद करण्यात आला होता. सदर गुन्हा तपासावर होता.

यातील संशयीत आरोपी विशाल यांच्या सवयी, स्वभाव व राहाणीमानाचा सातत्याने पाच महिने अभ्यास करुन त्याच्या हालचाली व वर्तणुकीतील झालेला बदल, यावरून कानपूर येथे

जाऊन पाळत ठेवली. तसेच गुन्हयातील बळीत व फिर्यादीचे कुटुंबिय यांचे सोबत आरोपीचे बदललेले व्यवहार व इतर बारकावे लक्षात घेऊन गु.प्र.शा. कक्ष—२ च्या पथकाने कौशल्याने सदरचा गुन्हा उघडकीस आणला आहे.

गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष — २ चे खालील नमुद पथकाने गुन्हे तपासाचा व्यवसायिक कस लावून सदरच्या क्लिष्ट गुन्हयाची कौशल्याने उकल केल्याने **मा.पोलीस आयुक्तांनी** त्यांना **ऑक्टोबर २०११** चे **बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ** अर्थात उत्कृष्ठ गुन्हे शोधाचे पारितोषिकाने सन्मानित केले आहे.

**तपास पथकातील अधिकारी व अंमलदार**

१) व.पो.नि. निशिकांत पाटील/कक्ष — २, गु.प्र.शा, गु.अ.वि., मुंबई
२) पो.उ.नि. भास्कर कदम/कक्ष — २, गु.प्र.शा, गु.अ.वि., मुंबई
३) पो.ना. २८४४२/सुभाष माळी/कक्ष — २, गु.प्र.शा, गु.अ.वि., मुंबई
४) पोशि ९८०६३६/व्हदयनारायण मिश्रा/कक्ष — २, गु.प्र.शा, गु.अ.वि., मुंबई
५) पोशि ०३०७६०/प्रमोद शिर्के/कक्ष — २, गु.प्र.शा, गु.अ.वि., मुंबई

……